# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२८ जानेवारी, २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7447744100 (PRO)


# पोलीस स्टेशन पडोली आणि भद्रावती पोलीसांची अवैध दारू तस्करांविरूध्द कार्यवाही

## २३ लक्ष ९१ हजाराचा मुद्द्‌ेमाल जप्त

दिनांक २८/०१/२०२० रोजी पोलीस स्टेशन पडोली आणि पोलीस स्टेशन भद्रावती येथील पोलीसांनी अवैध दारूतस्करी करणाऱ्यांवर कार्यवाही करीत एकुण दोन वेगवेगळया गुन्हयात २३,९१,०००/—रू चा मुद्द्‌ेमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २८/०१/२०२० रोजी पोलीस स्टेशन पडोली येथील पोलीस पथकाने गोपनीय माहितीवरून मौजा चिंचाळा येथे नाकेबंदी लावुन वाहनांची तपासणी दरम्यान एका मारोती रिट्स कार क्र. एमएच ३१ डीव्ही १५६५ ची झडती घेतली असता वाहनामध्ये ५५ बॉक्स देशी दारू किं. ५,५०,०००/—रू चा मुद्द्‌ेमाल जप्त करण्यात आला. सदर दारूचा माल आणि दारू वाहतुकीकरीता वापरलेली वाहन मारोती रिट्स किं. ४,००,०००/—रू असा एकुण ९,५०,०००/—रू चा मुद्द्‌ेमाल जप्त करण्यात आला आहे.

दुसरीकडे पोलीस स्टेशन भद्रावती येथील पोलीस पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीवरून मौजा काटवल तुकुम येथे एका घरात छापा टाकला असता, आरोपी नामे रमेश खुशाल राउत, रा. काटवल तुकुम यांचे घरात कापसाच्या ढिगाऱ्यात ३४ बॉक्स देशी दारूचा माल मिळुन आला. सदर दारूचा माल किं. ३,४०,०००/—रू आणि एक मोबाईल फोन किं. १,०००/—रू असा एकुण ३,४१,०००/—रू चा मुद्द्‌ेमाल जप्त करून आरोपीस अटक करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही डॉ. श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन पडोली पोलीस निरिक्षक श्री. गायगोले आणि पोलीस स्टेशन भद्रावती पोलीस निरिक्षक श्री. सुनिलसिंग पवार यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन भद्रावती परि. पोउपनि. श्री. बेलसरे आणि पोलीस स्टेशन येथील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी पार पाडली.

———————————————————————————————